NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २०.१०.२०२६ मंगळवार

नागपुर शहर गुन्हेशाखा पोलीस व उत्तर प्रदेश पोलीसांची संयुक्तीक कामगिरी :– लखनऊ येथील खुनाचे गुन्ह्यातील आरोपींना नागपुरातुन अटक .

दिनांक ०९.१०.२०२६ रोजी, तक्रारदार रंजन शर्मा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हजरतगंज, लखनऊ (उ.प्रदेश) येथे अप. क्र. २१६/२०२६, कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद खुनाचे प्रकरणाची प्रसारमाध्यमामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा असल्याने, उत्तर प्रदेश पोलीसांवर आरोपींना अटक करण्यासाठी मोठा दबाव होता. गुन्ह्यातील पाहिजे आरोपी श्रध्दा दुबे, रश्मी दुबे व वाहनचालक दानिश उर्फ तन्वीर अली ह्या तिघांवर पोलीसांनी प्रत्येकी ५० हजार रूपयांचे बक्षिस जाहीर केले होते. गुन्ह्यातील आरोपी हे घटनेपासुन फरार असुन, सतत आपली ठिकाणे बदलवित असल्याने ते मिळुन येत नव्हते. लखनऊ पोलीस तसेच, उत्तर प्रदेश विशेष कृती दल यांचे संयुक्त पथकाने नागपुर शहर पोलीस दल येथे संपर्क साधल्याने मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आदेशाने गुन्हेशाखा पोलीसांच्या ०४ टिम तयार करण्यात आल्या. नागपुर शहर गुन्हेशाखा पोलीसांनी उत्तर प्रदेश पोलीसांसोबत समन्वय साधुन सिसिटीव्ही फुटेज व आयपीडीआर (इंटरनेट प्रोटोकॉल डिटेल रेकॉर्ड) विश्लेषणाचे आधारे तसेच, गुप्त बातमीदारामार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे बेलतरोडी ह्दीत सापळा रचुन, चिंचभवन परीसरातील प्रोझॉन काल्म या अपार्टमेंट मधुन आरोपी श्रध्दा दुबे, रश्मी दुबे व वाहनचालक दानिश उर्फ तन्वीर अली यांना ताब्यात घेवुन, उत्तर प्रदेश पोलीसांचे स्वाधीन केले. पुढील कायदेशिर कार्यवाही सुरू आहे.

वरील महत्वपुर्ण कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा पोलीसांचे पथकातील अधिकारी अंमलदार यांनी उत्तरप्रदेश पोलीसांसोबत संयुक्तीकरित्या केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे नंदनवन :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १९.१०.२०२६ चे २०.५० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, बालाजी मंदीर चौक, गंगाजमुना वस्तीजवळ ग्रे रंगाचा शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला एक ईसम शस्त्रासह फिरत आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा ईसम दिसल्याने, त्याचे जवळ जात असतांना तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेवुन. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शिवम सेवक पारधी, वय २२ वर्षे, रा. नाईक तलाव, पाचपावली, नागपुर, ह.मु.– बैरागीपुरा, लकडगंज, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/– रू. चा मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. निलेश घायवट यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. सागर शिंदे यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कळमना :– गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १९.१०.२०२६ चे २२.३० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी मोहम्मद मुस्तफा मुजीब्बुर रेहमान अन्सारी, वय ३५ वर्षे, रा. तकीया दिवाण शहा, तहसिल, नागपुर हे लग्नाचे कार्यक्रमाकरीता पोलीस ठाणे कळमना हद्दीत भवानी मंदीर समोर सार्वजनिक रोडचे कडेला त्यांचे मुलास आयस्क्रीम घेण्यासाठी उभे होते. अमर लॉनकडुन येणाऱ्या एका दुचाकी चालकाने त्याचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचा मुलीगा मोहम्मद अदनान अन्सारी, वय ४ वर्षे यास जोरदार धडक देवुन व गंभीर दुखापत करून, घटनास्थळावरून पळुन गेला. जखमी मुलास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केलेले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. प्रशांत सरकटे ९६६५३८४८३२ यांनी आरोपी दुचाकी चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दुचाकी चालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे हुडेकश्वर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १५.१०.२०२६ चे ०९.४५ वा. ते दिनांक १९.१०.२०२६ चे ०७.२० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. ९१, शिवशक्ती नगर, बुध्द विहार जवळ, हुडकेश्वर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती वर्षा प्रमोद लुटे, वय ५२ वर्षे ह्या आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलीचे घरी मुंबई येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,४१,५००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे मपोउपनि. शलाका सिरसाठ ७३९१००९९९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. १८ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०३०२९/२०१५	कलम ३, ४, ७ अ.व्या.प्र. अधिनियम	१) रामबहादुर लखराम थापा, २) रमेश छबिलाल थापा, ३) गोरे कारबहादुर थापा, ४) मोहन रायबहादुर थापा, चौघेही रा. हॉटेल राधेय, रामदासपेठ सेंट्रल बाजार रोड, नागपुर. ५) हरविंदरसिंग हरनामसिंग चावला, रा. बाबाबुध्दाजी नगर, टेकानाका, नागपुर.	२६.१०.२०२६
२	मा. १५ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४०३१६/२००५	कलम ३२४, २९४, ५०६, ३४ भा.दं.वि.	१) बबलु अमनिप्रसाद मिश्रा, २) सुरेश लामलखन मिश्रा, ३) रमेश रामनारायण पांडे, तिघेही रा. संजय नगर, पांढराबोडी, बाबा राठोड चे घराजवळ, अंबाझरी, नागपुर.	२८.१०.२०२६
३	मा. १७ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०३४५५/२००९	कलम ३२४, ३४ भा.दं.वि.	सोनु हरीदास कोल्हटकर, वय २२ वर्षे, रा. ठक्करग्राम, स्वीपर कॉलोनी, पाचपावली, नागपुर	२३.१०.२०२६
४	मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर.	३०४०३७६/१९९९	कलम ८२ सिआरपिसी.	प्रशांत गोलछा, रा. दुबे बिल्डींग, गोलछा निवास, कडबी चौक, नागपुर.	२२.१०.२०२६

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.